राज्यातील दुष्काळ / टंचाईग्रस्त भागातील शालेय विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची कार्यपद्धती सुधारित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र. क्र. ४७/एसडी-५**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
तारीख: ०१ ऑगस्ट, २०१९

**वाचा :-**

१. **शासन निर्णय क्रमांकः एफईडी १५९२/१२०२[११३२]/साशि-५; दि. १८ ऑक्टोबर, १९९३.**
२. **शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१६/प्र.क्र. ३/एसडी-५; दि. १० मार्च, २०१६.**

**प्रस्तावना :-**

शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ/टंचाईग्रस्त भागातील राज्यमंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची योजना कार्यान्वित आहे. या शासन निर्णयातील तरतूदीनूसार दुष्काळ/टंचाईग्रस्त भागातील इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचे राज्य मंडळातर्फे आकारल्या जाणाऱ्या परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते.

२. महसूल विभागातर्फे दुष्काळी गावांची यादी जाहीर करताना, जिल्हा, तालुका व महसूल मंडळ याबाबतची माहिती घोषित केली जाते. जी गावे दुष्काळ/टंचाईग्रस्त म्हणून घोषित केली जातात अशा गावातील विद्यार्थ्यांची परिक्षेची फी माफ करणे अथवा परिक्षा फी माफीची प्रतिपूर्ती करणे असे सन २०१५-१६ पासून शासनाचे धोरण आहे. यासाठी मुख्याध्यापक इ.१० वी व १२ वी परिक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची नावे शिक्षण अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना कळवितात. शिक्षण अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक हे विद्यार्थ्यांची एकत्रित नावे राज्य मंडळाच्या विभागीय सचिव यांना पाठवतात. त्यानंतर विभागीय सचिवांकडून ही यादी राज्य मंडळाकडे पाठविली जातात. राज्य मंडळाकडून प्रतिपूर्तीचा प्रस्ताव शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्या मार्फत शासनाकडे निधी वितरणासाठी सादर करण्यात येतो. सदर प्रस्तावास शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येते. त्यानंतर शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्या मार्फत राज्य मंडळास निधी पाठविण्यात येतो. त्यानंतर राज्यमंडळा मार्फत विद्यार्थ्यांची परिक्षा फी प्रतिपूर्तीची रक्कम धनादेशाद्वारे संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना देण्यात येते व त्यानंतर शाळेमार्फत विद्यार्थ्यांना प्रतिपूर्तीची रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येते.

३. महसूल व वन विभागाकडून दुष्काळ/टंचाईग्रस्त गावे जाहीर होण्याची पद्धत व अनुषंगिक निर्णय माहे सप्टेंबर ते माहे मे पर्यंत निर्गमित होतात. इयत्ता १० वी व १२ वी परिक्षांकरीता विद्यार्थ्यांकडून अर्ज माहे ऑक्टोबर पर्यंत भरुन घेण्यात येतात. बऱ्याचदा दुष्काळ/टंचाईग्रस्त गावे उशीरा जाहीर होत असल्याने, विद्यार्थ्यांना परिक्षा फी ची प्रतिपूर्ती मिळाण्यात बराच कालावधी जातो. यानुषंगाने सध्याच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याच्या सूचना विभागास प्राप्त होत होत्या.

**शासन निर्णय :-**

विभागास प्राप्त सूचना विचारात घेऊन दुष्काळ / टंचाईग्रस्त भागातील इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या परिक्षा फीची प्रतिपूर्ती / माफी करण्याच्या कार्यपद्धतीत पुढील प्रमाणे सुधारणात करण्यात येत आहे:-

१. राज्य मंडळाने इयत्ता १० वी व १२ वी परिक्षेचे फॉर्म भरताना विद्यार्थ्यांचे महसूल मंडळ, गाव, तालुका व जिल्ह्याची, तसेच विद्यार्थ्यांचे/ पालकांचे बँक खात्याची माहिती घ्यावी.

२. विद्यार्थ्यांना फीची प्रतिपूर्ती / माफ करण्यात येणाऱ्या परिक्षा शुल्काच्या रकमेत प्रात्याक्षिक शुल्क, गुणपत्रिका शुल्क, गुणवत्ता प्रमाणपत्र शुल्क इ. खर्च समाविष्ट राहील.

३. महसूल विभागाने दुष्काळी गावांची यादी घोषित केल्यावर विद्यार्थ्यांचे फॉर्म भरण्यापूर्वी जी गावे दुष्काळी म्हणून घोषित केलेली असतील अशा विद्यार्थ्यांना फॉर्म भरतेवेळी कोणतेही शुल्क भरावे लागू नये, याची दक्षता राज्य मंडळाने घ्यावी.

४. दुष्काळग्रस्त भागातील असल्याने ज्या विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे परिक्षा शुल्क आकारण्यात आले नाही त्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्काच्या प्रतिपूर्ती रक्कमेचा प्रस्ताव राज्यमंडळाने शिक्षण संचालकांस माहे नोव्हेंबर अखेर पर्यंत सादर करावा, जेणेकरून ३१ मार्च पर्यंत प्रतिपूर्तीची रक्कम राज्य मंडळास अदा करणे शक्य होईल.

५. विद्यार्थ्यांनी फॉर्म भरल्यानंतर महसूल विभागातर्फे जी गावे दुष्काळी म्हणून जाहीर होतील, अशा गावातील विद्यार्थ्यांची माहिती महसूल विभागाच्या या संदर्भातील प्रत्येक शासन निर्णयानंतर, राज्य मंडळाच्या संगणक प्रणाली मधून शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना मंडळामार्फत देण्यात यावी.

६. शिक्षण संचालक यांनी राज्यमंडळाने विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेली परिक्षा फीच्या रकमेची प्रतिपूर्ती विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या बँक खात्यात RTGS द्वारे जमा करावी. याकरीता आवश्यक सर्व व्यवस्था, शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी करावी.तसेच या करिता संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने नियंत्रण असावे.

७. याकरीता विशेष कक्ष शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी स्थापन करावा.

८. दुष्काळी भागातील इ. १० वी इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षा फी माफीची सवलत ही योजना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा वगळता अन्य सर्व म्हणजे शासकीय / खाजगी अनुदानित/ विना अनुदानीत माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

९. दुष्काळ/टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना उपरोक्त अ.क्र. २ मध्ये नमूद सर्व परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती करण्याकरिता आवश्यक निधीची तरतूद अंदाजपत्रकात होईल व आवश्यकतेप्रमाणे निधीची मागणी विहीत वेळेत करण्याची दक्षता शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी घ्यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८०११११५९४९०२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=065279b98828b1456ad0d62a97fa45eee948af8abe5a27104d4e132c5bd1d93a, cn=Suvarna Siddharth Kharat
Date: 2019.08.01 12:06:38 +05'30'

(डॉ. सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
३. मा. अप्पर मुख्य सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
४. मा. सचिव, (महसूल व वन विभाग) यांचे स्वीय सहायक.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
६. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
७. अध्यक्ष/ सचिव, महराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ, पुणे.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १,२ मुंबई/ नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. वित्त विभाग, (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
१३. अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
१४. निवड धारिका एस.डी.-५